क्रमांक : का.स./बैठक/२०५/विशेष बैठक

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १७ मार्च, २००४.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ फेब्रुवारी, २००४ (सोमवार) रोजी झालेल्या विशेष बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१७.३.२००४

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

शासनाचे मुख्य सचिव - **अध्यक्ष**
सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर - **सदस्य**
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे - **सदस्य**
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री.हरिशंकरन् - **सदस्य**
कार्यकारी संचालक इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
आय.एल. अँड एफ.एस्. फिनान्सिअल सेंटर, प्लॉट क्र.सी-२२,
'जी' ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

शासनाचे प्रधान सचिव - **सदस्य**
नगर विकास विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

| | | |
|---|---|---|
| महापालिका आयुक्त<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| शासनाचे प्रधान सचिव<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,<br>मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक<br>सिडको, निर्मल, नरिमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२३. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण. | - | सदस्य |

निमंत्रित :

शासनाचे सचिव
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे प्रधान सचिव (उद्योग)
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

शासनाचे सचिव (पर्यावरण)
उर्जा व पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेपित :-

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

*********

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १६ फेब्रुवारी, २००४ (सोमवार) |
| वेळ | : | दुपारी १२.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री.अजित निंबाळकर<br>शासनाचे मुख्य सचिव | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.र.य.तांबे | - | सदस्य |
| डॉ.सुरेश जोशी<br>शासनाचे प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग | - | सदस्य |
| श्री.विनय मोहन लाल<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको. | - | सदस्य |
| श्री.अरुण कुमार मागो<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.विश्वास धुमाळ
शासनाचे प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग

श्री.सुब्रत राठो
अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे),
बृहन्मुंबई महानगरपालिका

डॉ.टी. चंद्रशेखर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.वि.कृ.फाटक
प्रधान प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सु.प्र.पेंढारकर
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार,
सचिव, कार्यकारी समिती (अतिरिक्त कार्यभार),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : दिनांक ९ ऑगस्ट, १९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या विशेष बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक ९ ऑगस्ट, १९९९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या विशेष बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद घेतली.

**बाब क्र.३ : सार्वजनिक उपक्रमांमधील अतिरिक्त निधीच्या गुंतवणुकीबाबत विधी सल्लागारांचे अभिप्राय.**

३.१ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी बाब टिप्पणीबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी प्राधिकरणाने गुंतविलेल्या निधीवर आपले अभिप्राय दिलेले आहेत. त्याचबरोबर गुंतवणूक धोरणासंबंधी संलग्न असलेल्या बाबींवर,

विधी सल्लागार यांचा सल्ला घेण्यात आला आहे. तो कार्यकारी समितीपुढे माहितीसाठी सादर करण्यात आलेला आहे. विधी सल्लागारांच्या सल्ल्यानुसार प्राधिकरणाच्या गुंतवणूकीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ७ चे पोटकलम (३)(V) नुसार फक्त कार्यकारी समितीस देण्यात आलेले आहेत व प्राधिकरणाने निधी कशाप्रकारे गुंतवावा याबाबत निदेश देण्याचे अधिकार कलम १८ (२) खाली शासनास आहेत. तसेच कर्ज देण्याचे अधिकार अधिनियमातील २१ (अ) तरतूदीनुसार प्राधिकरणास देण्यात आलेले आहेत.

३.२ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी शासनाच्या विविध उपक्रमांकडे असलेल्या प्राधिकरणाच्या ठेवींची माहिती कार्यकारी समितीस दिली व याबाबतची सविस्तर माहिती कार्यवाही अहवालासोबत जोडली आहे असेही सांगितले. तसेच, प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने दिनांक २५ जानेवारी, १९९९ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ज्या संस्थांनी प्राधिकरणाच्या ठेवी / कर्जे वेळेवर परत केलेली नाहीत त्या संस्थांना हयापुढे प्राधिकरणाने कार्यकारी समितीच्या संमतीशिवाय अधिक ठेवी / कर्जे देऊ नये असे ठरविण्यात आले होते. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांनी या अगोदर प्राधिकरणाची ठेव वेळेवर परत केली नव्हती. तरीही सदर संस्थांना निधीची आवश्यकता असल्यामुळे शासन आदेशानुसार व कार्यकारी समितीच्या संमतीने त्यांना अतिरिक्त निधी देण्यात आलेला आहे असे मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले.

३.३ श्री.सुकथनकर, सदस्य यांनी प्राधिकरणास तातडीने न लागणारा निधी दीर्घकालीन मुदतीमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेचे कर्ज रोखे / बॉंड (आयकर मुक्त) मध्ये गुंतविण्यात यावेत असे सांगितले. मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी सांगितले की, शासन निर्णय दिनांक ६.८.२००२ नुसार सार्वजनिक उपक्रमांकडे असलेला अतिरिक्त निधी राष्ट्रीयकृत बँकेत, ट्रेझरी बील, केंद्र शासनाच्या सिक्युरिटी, सिकॉम व सार्वजनिक उपक्रमांमध्ये गुंतवावा असे आदेश दिलेले आहेत. सदर गुंतवणूकीचा कालावधी १ वर्षापेक्षा (राष्ट्रीयकृत बँकेतील गुंतवणूक वगळता) जास्त असू नये असेही शासन निर्णयात नमूद केलेले आहे असे स्पष्ट केले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे

कर्जरोखे (बाँड) यांचा कालावधी १ वर्षापेक्षा जास्त असल्यामुळे प्राधिकरणाचा अतिरिक्त निधी रिझर्व्ह बँकेच्या कर्ज रोख्यांमध्ये गुंतविण्यात येत नाही. प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे सार्वजनिक उपक्रमाच्या संज्ञेमध्ये येत नसल्यामुळे गुंतवणूकीबाबतचा शासन निर्णय प्राधिकरणास लागू होत नाही असा त्यांनी यापूर्वी सल्ला दिला आहे असे सांगितले. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या निर्देशानुसार यापूर्वीच सदर प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. पुन्हा शासनास या विषयावर स्मरणपत्र पाठविण्यात येईल.

३.४ मुख्य लेखाधिकारी व वित्त सल्लागार यांनी पुढे सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास ऑक्टोबर / डिसेंबर १९९८ मध्ये रु.१२५/- कोटी इतकी ठेव १ वर्षाकरीता १४% व्याजदराने शिवशाही प्रकल्पासाठी दिलेली आहे. शासन निर्णय दिनांक २७.१२.२००१ नुसार सदर ठेवीवर ९.४०% दराने दिनांक १ जानेवारी, २००२ पासून व्याज अदा करण्यात येणार आहे. तसेच दिनांक ३०.१२.२००३ च्या शासन निर्णयानुसार दिनांक १ मे, २००३ पासून सदर ठेवीवर शासनाकडून ६% व्याज अदा करण्यात येणार आहे. मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार यांनी असे सादर केले की, प्राधिकरणास शासन निर्णयानुसार देखील ठेवीवरील व्याजाची रक्कम मिळत नाही. महालेखाकार यांनी दिनांक २७.१.२००४ च्या पत्रान्वये प्राधिकरणाने महाराष्ट्र शासन ठेव रक्कमेवर ठेवीच्या तारखेपासून व्याज देत नसल्यामुळे, शासन निर्णयानुसार दिनांक २७.१२.२००१ नुसार ९.४०% व्याजाच्या दराने दिनांक १ जानेवारी, २००० पासून लेख्यामध्ये व्याजाची तरतूद करावी व आधीच्या कालावधीची लेख्यामध्ये करण्यात आलेली व्याजाची तरतूद लेख्यातून रद्द करण्यात यावी असे कळविले आहे. त्यामुळे सदर ठेवीवर ऑक्टोबर, १९९८ पासून डिसेंबर, २००१ पर्यंत १४% व्याजाच्या दराने करण्यात आलेली तरतूद रक्कम रु.५९.०७ कोटी ही लेख्यामधून वगळण्यात येईल व यापुढे शासन निर्णयानुसार ठेवीवर व्याज आकारण्यात येईल. शासनाकडून व्याजाची व ठेवीची रक्कम मिळत नसल्यामुळे सदर ठेवीवर विलंब दंडणीय व्याजाची तरतूद लेख्यामध्ये करण्यात येऊ नये.

३.५ सदरहू बाब टिप्पणीवर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला :-

१) प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी गुंतवणूकीबाबत दिलेल्या अभिप्रायाची कार्यकारी समितीने नोंद घेतली.

२) प्राधिकरणास मुंबई नागरी परिवहन प्रकल्प व मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व इतर प्रकल्पासाठी निधीची आवश्यकता असल्यामुळे शासनाकडे / सार्वजनिक उपक्रमांकडे प्राधिकरणाच्या असलेल्या ठेवी व त्यावरील व्याज लवकर परत करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात यावी.

३.६ त्यानुसार कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाने महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागास शिवशाही प्रकल्पाकरीता रु.१२५ कोटी ठेवीची रक्कम एका वर्षासाठी १४% व्याजाच्या दराने ऑक्टोबर व डिसेंबर, १९९८ मध्ये देण्यात आली होती. शासन निर्णय दिनांक २७.१२.२००१ नुसार ठेवीवर ९.४०% व्याजाच्या दराने जानेवारी, २००२ पासून व्याजाची रक्कम अदा करण्यात येत आहे. सदर ठेवींवर व्याजापोटी ऑक्टोबर, १९९८ ते डिसेंबर, २००१ या कालावधीसाठी रु.५९.०७ कोटीची तरतूद प्राधिकरणाच्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात आली होती. प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र यांनी दिनांक २७.१.२००४ च्या पत्रात कळविल्यानुसार करण्यात आलेली सदरहु व्याजाची तरतूद प्राधिकरणाच्या लेख्यांतून रद्द करण्यात यावी व यापुढे सदर ठेवींवर शासन निर्णयानुसार व्याजाची आकारणी करावी."

त्यानंतर, मा. अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

——— oooooooooo ———